# लोकमान्य टिळक शिक्षण संस्थेचा करार

नागपूर : लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था आणि क्विक हील फाऊंडेशन यांच्यात करार झाला आहे. करारांतर्गत फाऊंडेशनतर्फे सायबर जनजागृती साक्षरता सेल स्थापन करण्यात येणार आहे. या अंतर्गत युवकांना सायबर



गुन्हे आणि सायबर गुन्ह्याच्या घटनांपासून सावध करण्यासाठी फाऊंडेशन काम करणार आहे. कराराप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून सीएसआरचे व्यवस्थापक अजय शिर्के, एक्झिक्युटिव्ह सुगंधा दाणी, संचालक अभिजित देशमुख, प्राचार्य डॉ. महेंद्र सिंग, प्राचार्य डॉ. विवेक नानोटी, प्राचार्य डॉ. रवींद्र क्षीरसागर, प्राचार्य डॉ. नितीन चौधरी, डॉ. अभय शेंडे, प्रा. उघडे आदी उपस्थित होते. या करारांर्गत दोन्ही संस्थांचे तज्ज्ञ विद्यार्थ्यांसमोर विचार मांडतील आणि संयुक्त जागरूकता कार्यक्रमांचे आयोजन करतील. क्विक हील फाऊंडेशन सायबर क्राईम जागरूकताचे प्रकाशन विद्यार्थ्यांमध्ये वितरित करणार आहे. शैक्षणिक बदल आणि संवादाला प्रोत्साहन हे कराराचे मुख्य उद्देश आहेत. कराराचे यशस्वी आयोजन ऋचा सिंग आणि प्रा. जोगी जॉन यांनी केले.